**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.४**

**जून २०२१**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार,दि.१८/६/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता मा.महापौर, मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.तसेच या कालावधीत मे.महाराष्ट्र शासन यांचे मा.मुख्यसभेस प्रत्यक्ष उपस्थितीबाबत आदेश आल्यास सदरची मासिक सभा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

**महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.**

**स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्र.८०**

संदर्भ – १) मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. १९/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२७३,दि.२५/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ९ ब मध्ये एक नविन ॲम्ब्युलन्स (ऑक्सीजन सहीत) खरेदी करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, बजेट कोड- सीई२० अे१०२/एसए२-१०२६, पान क्र. १५७, प्रभाग क्र.९ ब विधातेवस्ती येथील योगिराज पतसंस्थेशेजारील रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे | २० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र. ९ ब मध्ये एक नविन ॲम्ब्युलन्स (ऑक्सीजन सहीत) खरेदी करणे | -- | २० लाख |

**विषय क्र.८१**

संदर्भ – १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०७-अ.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/९० दि.१७/५/२०२१ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२७५,दि.२५/५/२०२१

----

स्थानिक निधी लेखापरिक्षण संचनालय महानगरपालिका लेखापरिक्षण शाखेमार्फत पुणे महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील पुणे महानगरपालिका लेखापरिक्षण अहवाल मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.८२**

संदर्भ – १) मे.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रआयो २०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२(सेल) शिबीर कार्यालय नागपूर दिनांक ०९/१२/२०१५

२) मे.राज्य शासन निर्णय क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२(सेल) शिकाना दि.११ जानेवारी २०१८

३) मे.राज्य शासन निर्णय क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२(सेल) शिकाना दि.२४ जानेवारी २०१८

४) मे.राज्य शासन निर्णय क्र.जमींन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१,शिकाना दि.१९ सप्टेंबर २०१६

५) मा.मुख्य सभा ठराव क्र.८७८,दि.२१/१२/२०१७

६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्र.मं.आ.योजना/५३,दि.४/०५/२०२१ चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.२९७,दि.२५/५/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सार्वजनिक खाजगी भागिदारी (PPP) तत्वावरील प्रकल्पांसाठी केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या प्रतिकृती पैकी (MODEL)प्रतिकृती क्र.५ पुणे महानगरपालिका स्तरावर पुणे महापालिकेच्या HDH/EWS आरक्षित मिळकतींवर तसेच जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या शासकीय, गायरान जमिनीवर राबविणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मौजे फुरसुंगी गट क्र.८२,मौजे लोहगाव गट क्र.३५ या शासकीय गायरान जमिनी व पुणे महानगरपालिकेच्या मौजे बालेवाडी स.नं.४४,४५ मौजे बालेवाडी स.नं.४९,५० मौजे बाणेर स.नं.पै मौजे कोंढवा बुद्रुक स.नं. ४३/१/ब.४४/, ४५/१ धानोरी स.नं.७/१,७/२ या जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत घटक क्र.३ साठी शासन निर्णय क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो–२(सेल) शिकाना दि.११ जानेवारी २०१८ नुसार खाजगी भागीदारी तत्वावरील प्रतिकृती क्र.५ राबविणेस.

२) उपरोक्त नमूद मिळकतींवर घटक क्र.३ अंतर्गत खाजगी भागीदारी तत्वावरील प्रतिकृती क्र.५ राबविणेकरिता विकसकांकडून मागणी प्रस्ताव (Request for Proposal) मागविणेस.

३) यशस्वी विकासकासोबत जमीन हस्तांतरणाचा व इतर अनुषंगिक करार करणेस.

४) प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत प्रतिकृती क्र.५ राबविणेकामी सर्वाधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८३**

संदर्भ – १) मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०४,दि.२५/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कोविडच्या पार्श्वभूमीवर रोजंदारीवर विद्युत दाहिनी व हॉस्पीटल मध्ये काम करणारे कर्मचारी कोरोनामुळे मृत्यूमुखी झाल्यास त्यांचे वारसांना र.रू.१० लाख रूपये देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८४**

संदर्भ – १) मा.सौ.मनिषा कदम यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०६,दि.२५/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३८ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) बजेटकोड सीई२०अे१०२/एसए२-१२५५, पान क्र. १६१, प्रभाग क्र. ३८ क दत्तनगर व प्रभागात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे<br>२) बजेट कोड सीई२०अे१०२/एसए२-१२५६, पान क्र. १६१, प्रभाग क्र. ३८ क जाधवनगर व प्रभागात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | १० लाख<br><br>१० लाख | ---<br><br>--- |
| नविन सुचविलेली कामे –<br>प्रभाग क्र. ३८ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८५**

संदर्भ - १) मा.युवराज बेलदरे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०७,दि.२५/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ४० अ मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) पान क्र. २४०, प्रभाग क्र. ४० अ अंजलीनगर मध्ये विविध विकास कामे करणे.(CE22A548/SJ10-2813)<br>२) पान क्र. १६१, प्रभाग क्र. ४० अ दत्तनगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे.(CE20A102/SA2-1275) | १० लाख<br>१० लाख | ---<br>--- |
| नविनसुचविलेलीकामे<br>प्रभाग क्र. ४० अ मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदीकरणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८६**

संदर्भ - १) मा.सौ.कालिंदा पुंडे यांचे दि. २४/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०८,दि.२५/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २५ ब मध्ये नव्याने अद्ययावत ॲम्ब्युलन्स खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>बजेटकोड क्र:-CE20B102/ST2-1398, पान क्र. २०५, प्रभाग क्र-२५ ब मध्ये वानवडी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात सुशोभिकरण करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम -<br>प्रभाग क्र. २५ ब मध्ये नव्याने अद्ययावत ॲम्ब्युलन्स खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनीसदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८७**

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दि.२१/०९/२०१७
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था-४/१११ दि. २०/५/२०२१ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३११,दि.२५/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेचे मागणीबाबत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील वस्तुस्थिती मे. राज्य शासनाचे निदर्शनास आणून शहर अभियंता कार्यालयाकडील दिवंगत अधिकारी कै.जयंत भाऊराव सरवदे, कार्यकारी अभियंता, श्रेणी - १ यांची वारस म्हणून त्यांचीअर्जदार मुलगी कु. अपूर्वा जयंत सरवदे यांना अथवा अन्य पात्र वारसास संदर्भीय शासननिर्णयातील तरतुदींमधून शिथिलता देऊन विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वावर पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील मंजूर पदावर नियुक्ती देणेस व त्याबाबत प्रस्ताव शासनमान्यता मिळणेसाठी सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८८**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३७ दि. २५/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३३२,दि.२५/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या दळवी हॉस्पीटल,शिवाजीनगर येथे कोव्हीड -१९ सेंटर आय.सी.यु.बेडसाठी १KL क्षमतेची -०२ नग क्रायोजनिक लिक्विड ऑक्सीजन टँक बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे हे काम मे.पुना इंजिनिअर्स, चिंचवडपुणे यांचेकडून र.रू.४,४१,२५०.०० पर्यंत कामे करून घेतल्याची बाब व त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांना बिल अदा केल्याची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.८९**

संदर्भ - १) सेक्युरिस्क मल्टीपल सोलुशन यांचा दिनांक १६/०४/२०२१ रोजीचा इ-मेलद्वारे दाखल प्रस्ताव.
२) मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका यांची दि.१७/०४/२०२१ रोजीची मान्यता.
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१४२ दि. २५/५/२०२१ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३३७,दि.२५/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

महापालिकेच्या दळवी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लान्ट बसविणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) नुसार खालील बाबींस मान्यता मिळाली असून जागेवर काम चालू करण्यात आले आहे.

१) दळवी हॉस्पिटल मध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लान्ट बसविणे व त्यासाठी रक्कम रूपये २,१०,९२,३००/- +२५,३१,०५२/-(१२% जी.एस.टी) असे एकूण रक्कम रूपये २,३६,२३,१५२/- इतका खर्च करणेस आणि सदरचे काम सेक्युरिस्क मल्टीपल सोलुशन यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) नुसार करून घेणेस, सदर कामासाठी १० दिवसाची मुदत देणेस तसेच सदरचा प्लान्ट कार्यान्वित झाल्यापासून ३ महिनेसदर कंपनीने चालविणे व मनपा कर्मचा-यांना सदर कंपनी मार्फत प्रशिक्षण देण्यास.

तरी उपरोक्त बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.९०**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१४३ दि. २५/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३३८,दि.२५/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे मनपा कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना शहरी गरीब योजने अंतर्गत पुणे मनपाचे पॅनेलवरील असणा-या खाजगी रूग्णालयात Mucormycosis या आजारावर र.रू. तीन लाखापर्यंतचा १००% उपचार खर्चास मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर खर्च करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.सभासदांचा प्रस्ताव**

**विषय क्र.९१**

संदर्भः- मा. सौ. कालिंदा पुंडे यांची सूचना दि.३१/५/२०21
१)मा. सौ. कालिंदा पुंडे व मा. सौ. अर्चना तुषार पाटील यांची सूचना दि.३/३/२०१८

-----

महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी या भवनाच्या परिसरामध्ये समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.१४८, दिनांक २८/६/२०१८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भः– मा. सौ. कालिंदा पुंडे व मा. सौ. अर्चना तुषार पाटील यांची सूचना दि.३/३/२०१८

–––––

महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी या भवनाच्या पहिल्या मजल्यावर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ७/६/२०२१

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.